# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
## ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३
## कार्यपत्रिका क्र. ४
## सभावृत्तांत

दिनांक :- ०७/११/२०१७ वेळ :- दु. १२.३० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा मंगळवार दिनांक ०७/११/२०१७ रोजी दु. १२.३० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा.सचिन बाजीराव चिंचवडे अध्यक्ष
२. मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ
३. मा. प्रज्ञा महेश खानोलकर
४. मा. संगिता राजेंद्र भोडवे
५. मा.मोरेश्वर महादु भोंडवे
६. मा.नामदेव जनार्दन ढाके
७. मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
८. मा.करुणा शेखर चिंचवडे
९. मा.सुरेश शिवाजी भोईर
१०. मा.अपर्णा निलेश डोके
११. मा.अश्विनी गजानन चिंचवडे पाटील
१२. मा.राजेंद्र तानाजी गावडे
१३. मा.विनोद जयवंत नढे
१४. मा.निता विलास पाडाळे
१५. मा.उषा दिलीप काळे
१६. मा.संतोष अंकुश कोकणे

याशिवाय खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा.संदिप खोत – क्षेत्रिय अधिकारी ब क्षेत्रीय कार्यालय, मा.रविंद्र जाधव - प्रशासन अधिकारी तथा सचिव सभाशाखा, मा.देवण्णा गटटुवार, - कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग, मा. एकनाथ पाटील – प्र. कार्यकारी अभियंता, विदयुत विभाग, मा.डॉ.सतिश गोरे – पशुवैदयकिय अधिकारी , मा.सी.बी.कोंडे – उपअभियंता, स्थापत्य , मा..सी.एन.धानोरकर – स्थापत्य विभाग, मा.एच.पी.बन्सल – उपअभियंता, स्थापत्य विभाग, मा.भाऊसाहेब साबळे - उपअभियंता, पाणीपुरवठा विभाग मा.अहिरे एस.एन. - उपअभियंता, पाणीपुरवठा विभाग ,,मा.आर.एम.पवार – उपअभियंता जलनिसारण विभाग मा.भागवानी सुनिल – उपअभियंता, नगररचना विभाग, , मा.के.बी.पारोल – मुख्य आरोग्य निरिक्षक, श्री.एस.एस.शिंदे – सर्व्हेअर , नगररचना व विकास, श्री.तावरे – कनिष्ठ अभियंता, नगररचना व विकास विभाग इत्यादी.

सर्वप्रथम मा. सभाध्यक्ष श्री.सचिन बाजीराव चिंचवडे यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात केली.

तदनंतर मा.अध्यक्ष यांनी मागील कार्यपत्रिका क्र.३, दि. ०३/१०/२०१७ रोजीच्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे प्रकट केले.

**तदनंतर उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१ रावेत येथील ब्रिजला संत तुकाराम महाराज च्या नावापुढे जगदगुरु श्री संत तुकाराम महाराज असे करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.नामदेव जनार्दन ढाके यांचा प्रस्ताव

विषय क्र.२ विवेक वसाहतमधील चौकास कै.लहानुबाई नामदेव गावडे असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.३ प्रभाग क्रमांक १७ मधील चिंचवडेनगर परिसरातील रहिवाशी कॉलनी प्लॉटधारक नांवे बोर्ड बनविण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.करुणा शेखर चिंचवडे यांचा प्रस्ताव.

ठराव क्र. २१ — विषय क्र. १
दि. ७/११/२०१७ — विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा.नामदेव जनार्दन ढाके — अनुमोदक: मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई.

संदर्भ :- मा.नामदेव जनार्दन ढाके यांचा दि. ७/११/२०१७ रोजीचा प्रस्ताव.

रावेत येथील नदीवरील पुल जो आहे त्या पुलाचे नामकरण संत तुकाराम महाराज असे आहे. संत तुकाराम महाराज हे जगदगुरु आहेत म्हणून त्यांच्या नावापुढे जगदगुरु श्री संत तुकाराम महाराज असे करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. २२ — विषय क्र. २
दि. ७/११/२०१७ — विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा.सुरेश शिवाजी भोईर — अनुमोदक: मा.अश्विनी गजानन चिंचवडेपाटील

संदर्भ :- मा. राजेंद्र तानाजी गावडे यांचा दिनांक ७/११/२०१७ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक १८ मधील विवेक वसाहत या रोडवरील मातोश्री बंगल्याजवळील चौकास तेथील जमिनीचे मुळ मालक श्री.बाबुलाल गावडे यांच्या मातोश्री कै.लहानुबाई नामदेव गावडे यांचे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. २३ — विषय क्र. ३
दि. ७/११/२०१७ — विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा. नामदेव जनार्दन ढाके — अनुमोदक: मा.सचिन बाजीराव चिंचवडे

संदर्भ :- मा. करुणा शेखर चिंचवडे यांचा दिनांक ७/११/२०१७ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक १७ मधील पुढे नमुद केलेल्या रहिवाशी कॉलन्यांमध्ये प्लॉटधारक यांच्या नांवे बोर्ड बनवून दयावेत त्यासाठी लागणारी माहिती आमचेकडे उपलब्ध आहे. तरी १) चिंचवडे कॉर्नर कॉलनी २) साठे कॉलनी नं.१ ३) ओम साई कृपा कॉलनी ४) ओम साई कॉलनी नं.१ ५) कृष्ण सुंदर कॉलनी ६) वृंदावन

कॉलनी नं.२ ७) वृंदासवन कॉलनी नं.१ ८) स्वप्नशिल्प कॉलनी ९) साईधाम कॉलनी १०) महादेव कॉलनी ११) स्वामी समर्थ कॉलनी १२) दत्तात्रय कॉलनी १३) स्वामी समर्थ कॉलनी १४) मुजोबा वसाहत १५) गुरुदत्त कॉलनी १६) जय गणेश कॉलनी १७) पंचरत्न कॉलनी १८) ज्ञानदीप कॉलनी १९) औंदुबंर कॉलनी २०) बळवंत कॉलनी २१) सोपान बाग कॉलनी २२) शिवप्रसाद कॉलनी २३) साईराम कॉलनी २४) मोरेश्वर कॉलनी २५) नंदनवन कॉलनी २६) सिध्दी विनायक कॉलनी २७)सिध्देश्वर कॉलनी २८) चिंचवडे कॉलनी कॉर्नर नं.२ २९) साठे कॉलनी नं.२ ३०) साठे कॉलनी नं.३ ३१) ओम साई कॉलनी नं.२ ३२) वृंदावन कॉलनी नं.३ ३३) वृंदावन कॉलनी नं.४ ३४) वृंदावन कॉलनी नं.५ ३५) वृंदावन कॉलनी नं.६ ३६) शिव साई कॉलनी नं.१ ३७) शिव साई कॉलनी नं.२ ३८) शिव शक्ती कॉलनी ३९) भोलेश्वर कॉलनी ४०) आदर्श हौ. सोसायटी ४१) स्वामी समर्थ कॉलनी नं.२ ४२) मोटे कॉलनी ४३) विठाई कॉलनी नं.१ ४४) विठाई कॉलनी नं.२ ४५) माळी फार्म कॉलनी ४६) आबासाहेब चिंचवडे वसाहत असे बोर्ड बनविण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले तदनंतर मा. अध्यक्ष , सचिन बाजीराव चिंचवडे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

[सचिन बाजीराव चिंचवडे ]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचव महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बक्षे/सभाशाखा/२/कावि/९२५/२०१७.
दिनांक : २० / ११ /२०१८

प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत -सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना